<u>अत्यंत तातडीचे</u>

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०२१/703
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :-25 / ०२ / २०२१

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. (सर्व)
३. शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (उ/द/प)
४. संस्थाचालक / प्राचार्य --------------- (सर्व)
शासनमान्य वाणिज्य व संगणक टंकलेखन / लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

**विषय :- शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स ॲण्ड स्टुडन्टस् (GCC-SSD-CTC) मार्च २०२१ परीक्षेबाबत.**

**संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२१/३७२ दि. २६/०१/२०२१**
**२. या कार्यालयातील दि. २४/०२/२०२१ रोजी सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे समवेत झालेली व्हिडीओ कॉन्फरन्स.**

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र.१ च्या अनुषंगाने शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स ॲण्ड स्टुडन्टस् (GCC-SSD-CTC) मार्च २०२१ ह्या परीक्षा दि. २ मार्च २०२१ ते ३१ मार्च २०२१ या कालावधीत घेण्याचे आयोजन करणेत आले आहे. या परीक्षेचे वेळापत्रकही जाहिर करणेत आले आहे.

कोवीड -१९ च्या प्रतिबंधात्मक उपाय योजनासाठी सुधारित निर्देशांचे पालन करणेबाबत कार्यालयीन आदेश निर्गमित केले आहेत. सदर आदेशानुसार जिल्ह्यांचे मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील ग्रामीण व शहरी भागांमध्ये संचार बंदीच्या कालावधीत सर्व प्रकारच्या शाळा, महाविद्यालय, शैक्षणिक प्रशिक्षण केंद्रे, खाजगी शिकवणी वर्ग, कोचिंग क्लासेस हे बंद ठेवण्याचे निर्देश पारीत केलेले होते. या अनुषंगाने संदर्भ क्र. २ अन्वये सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे समवेत व्हिडीओ कॉन्फरन्स आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस उपस्थित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे समवेत झालेल्या चर्चेनुसार यवतमाळ व औरंगाबाद जिल्हे वगळता इतर सर्व जिल्ह्यामध्ये पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा घेण्यात येणार आहे. त्या दृष्टीने सर्व संबंधितांनी कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शासन व स्थानिक प्राधिकरण यांनी दिलेल्या सर्व नियमांचे पालन करुन परीक्षा संचालनाबाबतची योग्य ती कार्यवाही करावी.

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१**